# १९७५ नंतरचे मराठी नाटक :

## आशय आणि रचना



Prashant

डॉ. माणिक माधव बागले

Scanned with CamScanner

५२. १९७५ नंतरच्या मराठी नाटकातील संघर्ष ........................ २७९
- प्रा. डॉ. अनिता गोपाळराव नाईक, प्रा. कैलास पंडितराव रामेश्वर

५३. 'आमदार सौभाग्यवती' : एक राजकीय नाटक ........................ २८४
- प्रा. महेंद्र ओतऱ्या गावित

५४. 'अधांतर' नाटकामधील व्यक्तिचित्रण ........................ २८८
- प्रा. संजय धर्मा पाटील

५५. १९७५ नंतरचे दलित नाटक व नाटककार ........................ २९२
- प्रा. विश्वास भवन भामरे, प्रा. राजेंद्र गुलाबराव काकुस्ते

५६. र. धों. कर्वे आणि समाजस्वास्थ्य ........................ २९८
- प्रा. देवेंद्र बाबुराव निकम

५७. 'कोण म्हणतं टक्का दिला' नाटकातील व्यक्तिरेखांचे स्वभावचित्र ........................ ३०३
- प्रा. डॉ. अक्षय किशोर घोडपडे

५८. प्रा. दत्ता भगत यांच्या नाटकांतील संघर्ष ........................ ३०७
- प्रा. ज्ञानेश्वर रामलाल भोई

५९. मो. ग. चव्हाणांच्या 'डाव'ची नाट्यचिकित्सा ........................ ३१२
- प्रा. राहुल पद्मसिंग चौहान

६०. १९७५ नंतरचे मराठी स्त्रीवादी नाटक ........................ ३१७
- प्रा. मंगला बन्सीलाल पाटील

६१. दत्ता भगत यांच्या 'वाटा-पळवाटा' या नाटकातील विचारसूत्र ........................ ३२१
- प्रा. श्रीकृष्ण वामन पद्मणे

६२. १९७५ नंतरचे स्त्रीवादी नाटक : 'मुलगी झाली हो!' ........................ ३२४
- प्रा. भाग्यश्री रामचंद्र पाटील

६३. १९७५ नंतरचे आंबेडकरवादी दलित नाटक ........................ ३२९
- प्रा. ममता काशिनाथ भारुडे

६४. शाम मनोहरांच्या नाटकातील स्त्री ........................ ३३५
- प्रा. डॉ. स्वाती भोजने

६५. १९७५ नंतरची मराठी समस्याप्रधान नाटके ........................ ३४०
- प्रा. डॉ. सविता काशिनाथ पटेल

६६. मराठी रंगभूमी आणि स्त्रीमुक्ती चळवळ ........................ ३४५
- डॉ. छबिलदास शालिग्राम करंके



Scanned with CamScanner

# १९७५ नंतरचे दलित नाटक व नाटककार

**प्रा. विश्वास भवन भामरे[१], प्रा. राजेंद्र गुलाबराव काकुस्ते[२]**
कला व वाणिज्य महाविद्यालय, अक्कलकुवा, ता. अक्कलकुवा, जि. नंदुरबार.
सि. गो. पाटील महाविद्यालय, साक्री, ता. साक्री, जि. धुळे.

मराठी साहित्याच्या प्रवाहात १९६० नंतर ग्रामीण स्त्रीवादी आदिवासी, जनवादी साहित्यप्रवाहासोबतच सर्वांत प्रभावशाली जो साहित्य प्रवाह निर्माण झाला तो म्हणजे दलित साहित्य प्रवाह दलित साहित्य प्रवाह एक समृध्द प्रवाह आहे. कथा, कविता, आत्मकथने आणि कादंबरी लेखना सोबतच नाटक हा साहित्यप्रकार देखील तेवढ्याच ताकदीने निर्माण केला आहे. मुळात दलितांनी व दलितांच्या जीवनाचे दर्शन घडविणारे साहित्याला 'दलित साहित्य' ही संज्ञा प्राप्त झाली. आणि त्यातूनच दलित कथा, दलित कविता, दलित आत्मकथने, दलित कादंबरी, दलित नाटके या संज्ञा साहित्य प्राकरांनाही रुढ झाल्या.

'दलित' ह्या शब्दाचाच अर्थ मुळी पिडलेले, नाडलेले, शोषीत, वंचीत, उपेक्षित असा आहे. अशा समूहाचा दडपलेला आवाज ज्या नाटकांमध्ये ज्या जाणिवेने प्रकट झाला आहे ते म्हणजेच दलित नाटक महाकारुणिक गौतम बुध्द, म. फुले, संत कबीर, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कार्ल मार्क्स यांच्या मानवतावादी तत्त्वज्ञानाचा आणि लौकिक विज्ञाननिष्ठ विचारांचा वारसा दलित नाटकाला लाभला आहे.

दलित नाटक खऱ्या अर्थाने १९७५ नंतरच अधिक प्रगल्भ आणि समृध्द होत गेले आहे. प्रस्तुत निबंधात त्याचा विचार करण्यात आलेला आहे. ९१७५ नंतरच्या नाटकांना पूर्वपरंपरा आहे. त्यात किसन फागो बरनोडे याचे 'संत चोखामेळा' १९२४, प्रबोधनकार ठाकरेंचे 'खरा ब्राह्मण' १९३३, मोरेश्वर तांबेचे 'प्रेमप्रताप' अर्थात 'महाराची सून', भि.शि. शिंदेचे 'चंद्रहार' १९५४, 'डाग' १९६१, मा.आ. कारंडेचे 'नदीवाट' १९५६, आण्णाभाऊ साठेंचे 'इनामदार' १९५८ इत्यांदी अनेक नाटकांनी दलित रंगभूमीची परंपरा निर्माण करण्याचे काम केले व त्याच वाटेने पुढच्या नाटककारांनी रंगभूमी समृध्द करण्याचे काम केले आहे.

**थांबा! रामराज्य येतय!** – मराठवाडा विद्यापीठ नामंतर आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या परिस्थितीतून वादळातून लेखक प्रकाश त्रिभुवन यांना हे नाटक लिहिण्याची प्रेरणा मिळाली. या नामांतर चळवळीमुळे मराठवाड्यात प्रतिकूल वातावरण निर्माण झाले. त्यामुळे अनेक दलितांची जीविताची व मालमत्तेची खूप



Scanned with CamScanner

मोठी हानी झाली. आणि अस्मितेच्या नावासाठी प्रस्थापितांनी दलितांवर अमानुष अत्याचार केले. त्यामुळे समतेची चळवळ शंभर वर्ष मागे गेल्यासारखी झाली या नाटकातील दलित कार्यकर्ता आनंद हा या नाटकाचा नायक आहे. शिक्षणामुळे आलेले आत्मभान; त्यातून निर्माण झालेली अन्यायाची जाणीव आपल्या हक्क आणि अधिकारांची झालेली पायमल्ली त्यामुळे, पोलीस पाटील पदासाठी आनंद व पोलीसपाटील यांच्यात झालेल्या संघर्षातून नामांतर चळवळीचेही उग्र झालेले रूपही दिसते. परंतु या संघर्षात आनंद संपतो. परंतू त्याच्या स्थान उभा राहिलेला विचार मात्र मागे राहतो. थोडक्यात आनंदने दलितांचा एक प्रतिनिधी म्हणून दिलेला संघर्षपूर्ण लढा कधीही संपणार नाही कारण हा संघर्ष परिवर्तनाच्या दिशेने जाणारा व सामाजिक न्याय व समता प्रस्तापित करण्याच्या वाटचालीतून ही प्रक्रिया पूर्ण होण्यासाठीचा आहे. हा या नाटकाचा मध्यवर्ती विचार आहे.

**कैफियत** – या नाटकात भारत हीच दलितांची मायभूमी, कर्मभूमी ही आहे असे असूनही दलितांच्या वाट्याला फक्त यातना, वेदना आणि दुःखभोग, छळ शिवाय जवळीक नाही. माणुसकीची वागणूक नाही दलितांना गावकुसाबाहेर रहावे लागले व संपूर्ण गावाच्या सेवेचे कार्य करूनही त्यांचा छळ, अत्याचार, अन्याय, लाचारी, गुलामी, वेठबिगारी यांच्या बेड्यात पिढ्यापपिढ्या बांधून ठेवले गेले. दलितांना प्रेमाच्या बदल्यात सूड, इमानदारीच्या बदल्यात छळ, कष्टाच्या बदल्यात तुच्छता, शौर्याच्या बदल्यात अपमान, इभ्रतीच्या बदल्यात बलात्कार आणि सत्याच्या बदल्यात मृत्यू हेच दलितांच्या वाट्याला आले आहे. अशी कैफियत या नाटकात नाटककार मांडतो.

**सूर्यास्त** – नाटककार हेमंत खोब्रागडे यांनी स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर कालखंडातील अन्यायाविरुध्द दास दलितांनी दिलेला संघर्षपुर्ण लढा दाखवून दलितांना स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय मिळवून देवून अन्यायकारक राजेशाहीचा व हुकुमशाहीचा सूर्यास्त नाटकात दाखवला आहे. यात रुन्तु, रुपा, राणी व राजा इत्यादी मुख्य पात्रे आहेत.

**न्याय** – स्वातंत्र्योत्तर भारतात सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल चालू असतांना दलित विरोधी वातवरण निर्माण होत आहे ही खेदाची गोष्ट आहे ह्या देशात स्वातंत्र्य, समता, बंधूता आणि लोकशाही निर्माण होण्यासाठी व त्यांचे रक्षण होण्यासाठी कायदा व न्याय ह्याची आवश्यकता आहे. म्हणून न्याय व न्यायसंस्था परिवर्तनाचा विचार देईल हे मध्यवर्ती सूत्र नाटककार श्री. बाबुराव कांबळे यांनी मांडले आहे. या नाटकात नारायण, प्रा. मिलीद कांबळे, सरपंचाचा भाऊ अरूण इत्यादी मुख्य पात्र आहेत.



Scanned with CamScanner

**साक्षीपुरम** – हे नाटक धर्मांतरावर आधारित अशा सत्य घटनेवर घेतलेले आहे. दलितांनी स्वीकारलेल्या धर्मांतरासारख्या ज्वलंत व वादग्रस्त घटनांचे वास्तवरूप म्हणजे रामनाथ चव्हाण यांचे हे नाटक आहे. १९८१ मध्ये मीनाक्षीपुरम (तामिळनाडू) येथील अस्पृश्यांनी केलेले मुस्लीम धर्मांतर हे गुलामापेक्षाही वाईट जीवन जगणाऱ्या भारतीय दलितांच्या असंतोषाचा उद्रेक आहे. ज्यांचे संपुर्ण जीवनच उद्वस्त झाले आहे.

**पोतराज** – पोतराज प्रथेविरुध्द जनमत तयार करण्याच्या हेतूने श्री. संपत जाधव यांनी हे नाटक रंगमंचावर आणले आहे. पुणे येथील पानमळ्याच्या झोपडपट्टीत एका पोतराजाचा पट बसविण्याच्या निमित्ताने त्यांनी पाहिलेली सत्यघटना हा या नाटकांचा विषय आहे. एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करतांना विज्ञानाचा काडीमात्र स्पर्श ह्या पोतराज मंडळींना झाला नव्हता. गंडा, दोरा, अंगारा, धुपारा हीच त्यांची दैवते आणि दैवीशक्ती होती. त्याविरुध्द लेखक श्री. संपत जाधव ह्यांनी लेखनीच्या माध्यमातून चळवळ उभी करून पोतराज ह्या प्रथेविरूध्द उभारलेला हा यशस्वी लढा आहे. या नाटकाचा नायक सर्जेराव आहे तो येथे सामाजिक कार्यकर्ता आहे.

**देवनवरी** – देवदासी म्हणजे देवाला सोडलेली, देवाशीच लग्न झालेली स्वतंत्र व्यक्तिमत्त्व नसलेली समाज उपभोग्य अशी स्त्री! प्रस्तापित समाज व्यवस्थेने स्वतःची चेन व सुरक्षिततेसाठी देवदासी सारख्या अनेक वाईट आणि नीच स्वार्थी हेतूने अनेक षडयंत्र देवाधर्माच्या नावाखाली विस्थापीत समाजाविरुध्द रचली आहेत. देवदासी प्रथा ही देखिल त्यापैकीच एक आहे. अशा देवदासीविषयी त्यांच्या प्रश्नाविषयी जीवनाविषयी, समस्यांविषयी अंतर्मुख करणारे दाहक वास्तवादी व भडक असे हे देवनवरी हे नाटक प्रेमानंद गज्वी यांनी लिहीले आहे.

**तनमाजोरी** – 'गुलामाला गुलामीची जाणीव करुन द्या म्हणजे तो बंड करून उठेल' ह्या मध्यवर्ती सूत्रावर प्रेमानंद गज्वी यांनी 'तनमजोरी' हे नाटक लिहिले आहे. यातील नायक वाशा हा आहे.

**शरण** – श्री. अच्युतराव सुरडकर लिखित 'शरण' हे तीनअंकी नाटक असून वर्षानुवर्षे गुलामीत जीवन जगणारा दलित जागृत होऊन अन्याय, अत्याचाराविरुध्द बंड पुकारतो व गुलामीची ही घट्ट शृखला तोडून मुक्त व निर्भय जीवन जगण्याचे शिक्षण घेऊन भगवान बुध्दाला शरण जातो हे या नाटकाचे मध्यवर्ती सूत्र आहे. या नाटकाचा नायक राऊबा हा आहे.

**हत्याकांड** – दलित समाजातील पिळवणूक, शोषण, अन्याय, अत्याचार, खून यांचे भीषण वास्तव कलमालकर डहाट यांनी 'हत्याकांड' या नाटकात रेखाटले



Scanned with CamScanner

आहे. दीनदलित, शेतमजूरांचे कष्टाचे जीवन आणि त्यांना होणारा सवर्ण गावकरी मंडळी पैकी पाटील, सावकार लोकांकडून होणारा जुलूम याविषयीचे विदारक चित्रण हा या नाटकाचा विषय आहे. त्या अनुषंगाने या नाटकाच्या कथानकातून ग्रामीण भागात राहणाऱ्या दलित शेतकऱ्यांचे असाहाय्य, कष्टमय जीवनाचे दर्शन दाखवितांना विठोबाच्या कुटुंबाची दुःखद कथा सांगितली आहे. पाटलाचा मुलगा विठोबाच्या बहिणीची व बायकोची अब्रु लुटतो व त्यातूनच विठोबाच्या भावाची, मित्राची व सर्व कुटुंबाची हत्या घडवून आणतो.

**वांझमाती** – फुले-आंबेडकरवादी चळवळीच्या या मातीत ध्येयनिष्ठ समर्पित जीवनाला वाहून घेतलेली ही नवरत्ने व त्यांची सेवा त्यांचे समाजप्रबोधनाचे कार्य वांझ ठरणार नाही. तसेच वास्तव आणि समाजवाद यांची सिमारेषा स्पष्ट करुनही दलित चळवळीला ताकद व पाठबळ देणारी सशक्त पराक्रमी तरुण पीढी हीच ह्या वांझमातीतील उद्याची भरीव स्वप्ने आहेत. दिव्य प्रकाशाचे साक्षीदार आहेत. भीमशक्तीचे शिलेदार आहेत. हा सारांश वांझमातीतून प्रेमानंद गज्वींनी दिला आहे. या नाटकाची नायिका वंदीता ही आहे. तर नागनाथ हा नायक आहे.

**आम्ही! देशाचे मारेकरी!** – राष्ट्रीय स्वयंसेवी संघ यांसारख्या संस्थांच्या काही पध्दती, शिस्त व गुरुदक्षिणा या विषयी जो काही प्रकार आहे, पध्दत आहे. त्यावर प्रकाश टाकून त्यातले सत्य समाजासमोर आणण्याचा प्रयत्न टेक्सास गायकवाड यांनी या नाटकात केलेला आहे. या नाटकाचा नायक जयवंत हा आहे.

**खेळिया** – प्रा. दत्ता भगत यांचे हे पहिलेच यशस्वी नाटक आहे. या नाटकाचा नायक नारायण हा आहे. संवर्ण आणि दलितांमध्ये नारायण हा खेळिया होतो असा या नाटकाचा आशय आहे.

**मन्वंतर** – हे नाटक आत्मचरित्रात्मक आहे. आंतरजातीय दलित-सवर्ण विवाहामुळे या टेक्सास गायकवाडसारखा जहाल गणला जाणारा, ऐकेकाळी ब्राम्हणांची कापाकापी केली पाहिजे असे सांगणारा केवळ ब्राम्हण जातीच्या मुलाशी विवाह केल्यामुळे ब्राम्हण जातीशी लेखकाचा जिव्हाळा झाला आहे. त्यामुळे युध्दाच्या मार्गाऐवजी बुध्दाच्या य मार्गाने प्रश्न सोडवला पाहिजे. हेच मन्वंतर चे आशयसूत्र अहे.

**वाटा-पळवाटा** – हे नाटक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाने भारावलेल्या तीन पिढ्यांच्या व त्यांच्याशी संबधित असलेल्या दलित राजकारण आणि समाजकारण या विषयीच्या चळवळीच्या संदर्भातील हे नाटक दलित-दलितेतरांना अंतर्मूख करणारे आहे.

**अकिंचन** – हे नाटक दादाकांत धनविजय यांचे आहे. दलित-सवर्ण



Scanned with CamScanner

यांच्यातील सूडनाट्य हा या नाटकाचा मुख्य विषय आहे. मानसाच्या अन्यायाला, आत्याचाराला, जुलूमाला सहन करण्यालाही काही मर्यादा असतात. दलित व्यक्ती ही तर अधिक सहनशिल आणि सोशिक असते. तरी सुध्दा सतत होणाऱ्या छळाला, अत्याचाराला व जुलूमाला कंटाळून जर सहनशक्ती संपली तर त्याचा परिणाम काय होऊ शकतो. हे या नाटकाचे कथानक आहे. विठ्ठल व लक्ष्मी या नाटकाचे मुख्ये पात्रे आहेत.

वादळातील **नौका** – या नाटकात दारुच्या व्यसनामुळे कुटुंबातील कर्त्या पुरुषाची झालेली शोकांतिका नाटककार चंद्रकांत देवकर यांनी चित्रित केलेली आहे. हे नाटक राम गणेश गडकरींच्या 'एकच प्याला' नाटकाची प्रतिकृती आहे.

**किरवंत** – हे नाटक प्रेमानंद गज्वींचे आहे. या देशात फक्त दलितांनाच हिन वागणूक मिळते असे नाही. तर नियमित स्नान संध्य मंत्र जप करुन पूजाअर्चा करुन किरवंताचे कार्य करणाऱ्या सिध्देश्वर ब्राम्हणाच्या नशिबी देखील उपेक्षेचे जीवन येते. जातीने ब्राम्हण पण कर्माने अधम म्हणून चित्पावन ब्राम्हणांना कोणत्याही शुभकार्यात शुद्राप्रमाणेच येणे वर्ज्य असते. स्मशान कर्म करणाऱ्या ब्राम्हण व्यक्तीला ब्राम्हण सभा, सत्यनारायणाचा प्रसाद घेण्यासाठी येऊ दिले जात नाही. धर्मशास्त्रात अत्येष्टी कार्य करणारा ब्राम्हण सर्वश्रेष्ठ पुण्यवान मानला गेला असूनही व्यवहारात त्यांना बहिष्कृताचेच जीणं जगावे लागते. असा 'किरवंत' नाटकाचा मुख्य विषय आहे.

**गांधी–आंबेडकर** – भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या कालखंडातील महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महापुरूषांमधील व्यक्तिगत राजकिय जीवनावर आणि त्यांच्यातील परस्पर संबंधावर एका नव्या तंत्राचा वापर करुन प्रकाश टाकणारे वैचारिक स्वरुपाचे महत्त्वपुर्ण नाटक प्रेमानंद गज्वी यांनी १९९७ साली लिहिले भारतीय राजकारण, समाजकारण आणि दलित चळवळ यांचा परस्पर संबंध उलगडून दाखविणारे तसेच ह्या दोन महापुरुषांचे व्यक्तिगत जीवन त्यांची विचारसरणी कार्यपध्दती व त्यांचा ह्या कालखंडावर पडलेला अनन्यसाधारण प्रभाव याभोवतीच हे नाटक बेतलेले आहे.

अशा तऱ्हेने या प्रस्तूत नाटकांचा अभ्यास या निबंधाच्या बाबतीत केला तर असे दिसून येते की, दलित समाजात आंबेडकर चळवळीने जे बदल व परिवर्तन हळूहळू घडवून आणले. त्यांचेही दर्शन घडते. देवदेवता, उपासतापास, जत्रा यात्रा, नवससायास दलितामधील वैचारिक मागासलेल्या अंधश्रध्दा यांना प्रतिनिधिक स्वरुपात का होईना हादरा बसतो. गावकीची कामे मेलेले जनावरे ओढणे वैगरे बंद होऊ लागले. शिक्षणाचे महत्त्व दलितांना कळू लागले. तसेच



Scanned with CamScanner

दलित-सवर्ण आंतरजातीय प्रेमविवाहने जातीयता संपेल हा विचारही प्रस्तुत झालेला आहे. त्याचप्रमाणे अंधश्रध्दा, गुलामी, वेठविगारी, देवदासी, अस्पृश्यता जातीभेद या सर्व गोष्टींच्या त्यागासाठी 'देवनवरी', 'तनमाजोरी', 'पोतराज', 'न्याय' आव्हाण करतात. दलितांच्या राजकारणाची दुबळी बाजू व त्याचबरोबरच सवर्ण प्रस्तापितांशी राजकीय स्पर्धेस व चळवळीस सामोरे जातांना दलित चळवळीची व कार्यकर्त्यांचीही झालेली शोकांतिका 'थांबा! रामराज्य येतयं!', 'खेळीया', 'वाटा पळवाटा' नाटकांनी दाखवून दिली. 'साक्षीपुरम' नाटकाने तर धर्मांतर प्रश्नास हात घालून राज्यकर्ते आणि समाज यांना दलितांच्या संदर्भात कायदा, न्याय, सुव्यवस्था, स्वातंत्र्य, समता व बंधुत्व, लोकशाही या तत्त्वांच्या बाबतीत संखोलपणे विचार करण्यास पुन्हा एकदा प्रवृत्त केले आहे.

संदर्भ


१. मोकाशी मधूकर, दलित रंगभूमी आणि नाट्य चळवळ.
२. खरात शंकरराव, दलित साहित्य - प्रेरणा व प्रवृत्ती.
३. जाधव रा.ग., निळी पहाट.
४. कवठेकर बाळकृष्ण, दलित साहित्य - एक आकलण.
५. इंगळे वामन, दलित मुक्तिलढा आणि दलित साहित्य.
६. महाजन त्र्यंबक, अ. भा. दलित नाट्यसंमेलन ०५, अध्यक्षीय भाषणे.
७. फडके भालचंद्र, दलित रंगभूमी.
८. व्हटकर नामदेव, मराठीचे लोकनाट्य - कला आणि साहित्य.




Scanned with CamScanner

olume 8 (Special Issue 04)
anuary, 2018

ISSN-2230-9578

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS
IMPACT FACTOR
4.270

**UGC Journal list No. 64768**



**Editor : Dr. R. V. Bhole**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No- 23, Mundada Nagar,
Jalgaon(M.S.) 425102
Email – info@jrdrb.com        Visit – www.jrdrvb.com

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| ४२ | शेतकन्यांच्या आत्महत्यांची कारण मिमांसा | प्रा.श्रीमती.एम.व्ही.चौधरी, महीला महाविद्यालय, शिरपूर |
| ४३ | भुमीकन्या बहीनाबाई चौधरी यांच्या काव्यातील ग्रामीण कृषी दर्शन | डॉ.संजय महाले, कला विज्ञान महाविद्यालय, धडगांव |
| ४४ | ग्रामीण विकासात शेतीचे योगदान | प्रा.राठोड मदनसिंग सुपडु, आदर्श महाविद्यालय, निजामपुर |
| ४५ | ग्रामीण विकासासाठी कृषीचे योगदान | डॉ.पंकज देवरे, कला विज्ञान महाविद्यालय, सोनगीर |
| ४६ | ब्रिटीशांचे खानदेशातील कृषी विषयक धोरण आणि त्यांचे परिणाम | डॉ.संजय जिभाऊ पाटील, कला महाविद्यालय, नवलनगर |
| ४७ | कृषी संस्कृती की गाथा गोदान | कैलास आखाडे, सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे. |
| ४८ | ग्रामीण कादंबरीतील दिसनारे कृषी व ग्रामीण जीवण | प्रा.राजेंद्र काकुस्ते, सि.गो.पाटील महाविद्यालय, साक्री |
| ४९ | ग्राम—साहित्य मे कृषी विषयक विचार | डॉ.अशोक पवार, ग.तु.पाटील महाविद्यालय, नंदुरबार |
| ५० | गोतावळातील यंत्र मानव संघर्ष | डॉ.सी.एस.रंगे, कला महाविद्यालय, बामखेडा |
| ५१ | गराडा कादंबरीतील बदलत्या कृषी जिवणाचे स्वरूप | प्रा.किशोर पाठक, कला महाविद्यालय, चोपडा. |
| ५२ | ग्रामीण साहित्य कादंबरीतील कृषी जीवन | प्रा. रामचंद्र रतन मालीच |
| ५३ | नंदुरबार जिल्हयातील लोकसंख्या वाढीमुळे भूमी उपयोजनात झालेला बदल : भौगोलिक अध्ययन. | डॉ. नामदेव नरसिंगराव गजरे, नंदुरबार. |
| ५४ | हरितगृह परिणाम - एक अभ्यास | .डॉ. सुनिल विक्रम कुवर, नंदुरबार. |

Scanned with CamScanner

# "ग्रामीण कादंबऱ्यातून दिसणारे कृषि व ग्रामीण जीवन"

**प्रा. राजेंद्र जी. काकुस्ते,** (मराठी विभाग), विद्या विकास मंडळाचे सी.गो.पाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, साक्री.

**प्रास्ताविक -**

कृषिप्रधान देश म्हणून प्राचीन काळापासूनची आपल्या देशाची ओळख आहे. पारंपरिक पद्धतीने शेती करुन उपजिवीका करणारी समाज व्यवस्था प्रचलीत आहे. बदलत्या काळानुसार विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीच्या झोतात कृषी क्षेत्रात नवनवीन प्रयोग होऊ लागल्याचे दिसते. त्याचे दर्शन मराठी ग्रामीण साहित्यातून उमटलेले आहे. "साहित्यातून समाजाचे प्रतिबिंब उमटते" या निकषानुसार मराठीतील ग्रामीण साहित्याचा विचार करता येईल. ग्रामीण साहित्याची सुरुवात ही गांधीजीच्या 'खेड्याकडे चला' या विचारधारेतून झालेली आहे. शहरी समाज जीवनाचे वर्णन म ाठी साहित्यातून करणाऱ्या साहित्यिकांनी आपली द् ष्टी ग्रामीण भागाकडे वळवली असता, ग्रामीण समाजव्यवस्था ही संमीश्र समाज व्यवस्था असल्याचे लक्षात आले. अनेक जातीधर्मांचे, विविध व्यवसाय करणारे, निरनिराळी भाषा बोलणारे, विचित्र जीवन निष्ठा व श्रद्धा असणारे लोक ग्रामीण समाजात राहतात. असे असले तरी सर्वांचे जीवन हे कृषी (शेतीशी) निगडीत असल्याचे जाणवते. या गोष्टींचा विचार करुन ग्रामीण मानवी जीवनाचे वर्णन साहित्यातून होऊ लागले.

साहित्याच्या कथा, कादंबरी, क ता इ. प्रकारातून ग्रामीण जीवन चितारले जाऊ लागले. साहित्य आणि समाजव्यवस्था यांचा जवळचा संबंध आहे. किंबहुना साहित्य हे मानवी जीवनावरच अवलंबून असते. माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. तो समाजापासून दुर राहू शकत नाही. त्यादिशेने साहित्याचा विचार होऊ लागला. यामुळे ग्रामीण जीवनातील कृषी क्षेत्राबदलाची माहिती साहित्यातून सहज उपलब्ध होऊ लागली. शेतीवर आधारीत अर्थव्यवस्था असल्यामुळे ग्रामीण समाजजीवनावर बदलत्या जागतिकीकरणाचा परिणाम झालेला दिसतो. त्याचे वर्णन मराठी साहित्यकांनी आपल्या साहित्यातून चितारले आहे.

या संदर्भात प्रातिनिधीक स्वरुपात काही निवडक ग्रामीण कादंबऱ्यांच्या आधारे साहित्याचा कृषी व ग्रामीण जीवनाशी असलेला संबंध अधोरेखीत करता येईल. त्यात प्रामुख्याने ग्रामीणजीवनाचे दर्शन घडवणाऱ्या काही कादंबऱ्या सांगता येतील. आनंद यादवांच्या झोंबी, नांगरणी धरभिती, गोतावळा इ. कादंबऱ्यांतून कृषि संस्कृतीचे जीवन चितारले आहे. यंत्रयुगाचा परिणाम ग्रामीण जीवनावर कसा झाला, त्यामुळे पारंपरिक कृषि. संस्कृतीवर एकप्रकारे आघात झाला याचे वर्णन 'गोतावळा' कादंबरीत आनंद यादव करतात.

'गोतावळा' कादंबरीतील 'नारबा' ही व्यक्तिरेखा पारंपरिक वेठबिगार असून तो बालपणापासून पोरका आहे. त्याला जमीनदार असणाऱ्या मालकाकडून अश्वासित केले जाते की, तुझा स्वतःचा गोतावळा निर्माण करुन देईल. या आशेवर तो जमीनदाराच्या शेतात राबतो. तेथील पशु-पक्षी, वृक्ष-वनस्पती यात रमतो. तेच सारे त्याचे गणगोत बनून जातात. पण आधुनिकतेचा परिणाम म्हणून मालक नवीन ट्रॅक्टर विकत घेतो. ट्रॅक्टर हे यंत्र युगाचे प्रतिक आहे. ट्रॅक्टरसोबत ड्रायव्हर येतो. मालकाला नारबापेक्षा ड्रायव्हरची उपयुक्तता अधिक वाटू लागते. म्हणून तो ड्रायव्हर आता नारबापेक्षा महत्त्वाचा वाटू लागतो. ड्रायव्हरचे वाढते अस्तित्व नारबाला सहन होत नाही. त्याचबरोबर नारबाच्या गोतावळ्यातील जस-जसा एक-एक पशु-पक्षी कमी होऊ लागतात व उजाड माळरानावरील तोडल्या जाणाऱ्या झाडांच्या फांद्या ह्या जणू आपल्या शरीराचे एक अवयव छाटल्याचे दुःख त्याला होऊ लागते. कारण त्या सर्वांशी नारबाचे भावनीक नाते जोडले गेलेले होते. या सर्वांबदल तो मालकाशी बोलतो तेव्हा मालक उद्दामपणे "तुला सहन होत नसेल तर तुझा तु रस्ता धर! असे म्हणतो. तेव्हा नारबाच्या पोटात गोळा उठतो व त्याच मन उद्विग्न होते. तेव्हा ते सर्व सोडून जातो. त्याचा भावनीक गोतावळा तुटतो. यावरुन आनंद यादवांची 'गोतावळा' ही कादंबरी म्हणजे एकाकीपणा, भय, क्रुरता, मृत्यु इ. गोष्टीचे प्राथमिक पातळीवरील चिंतनच होय. कृषि संस्कृतीवर यंत्र संस्कृतीचे झालेले आक्रमण होय. नारबा सारख्या सर्व सामान्य मजुराच्या जीवनाची झालेली वाताहत आहे. आनंद यादवांच्या 'गोतावळा' कादंबरीतून शेती आणि ग्रामीण जीवनाची झालेली अधोगती प्रकट होते.

सदानंद देशमुख यांच्या 'तहान व बारोमास' या कादंबऱ्यांतून बदलत्या राजकीय, आर्थिक धोरणांचा परिणाम ग्रामीण जीवनावर कसा होतो ते चितारले आहे. त्याचबरोबर दुष्काळासारख्या वारंवार येणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे ग्रामीण जीवनावर पर्यायाने कृषी जीवनावर होणाऱ्या आघातांमुळे ग्रामीण मानवी जीवनाचे खच्चीकरण होतांना दिसले. सदानंद देशमुखांची 'तहान' ही १९९८ साली प्रकाशित झालेली कादंबरी होय. या कादंबरीत बदलत्या ग्रामीण जीवनात आजच्या तरुण पिढीची कोंडी कशी होते ते दाखवले आहे. तरुण पिढीला या परिवर्तनाच्या काळात अनेक ताण-तणावांना सामोरे जावे



Scanned with CamScanner

जीवनावर पर्यायाने कृषी जीवनावर होणाऱ्या आघातांमुळे ग्रामीण मानवी जीवनाचे खच्चीकरण होताना दिसते. सदानंद देशमुखांची 'तहान' ही १९९८ साली प्रकाशित झालेली कादंबरी होय. या कादंबरीत बदलत्या ग्रामीण जीवनात आजच्या तरुण पिढीची कोंडी कशी होते ते दाखवले आहे. तरुण पिढीला या परिवर्तनाच्या काळात अनेक ताण-तणावांना सामोरे जावे





लागते. याचे चित्र 'तहान' मध्ये येते. ग्रामीण भागाला येणारे बकालपण, पोट भरण्यासाठी करावी लागणारी वणवण, अर्थार्जनासाठी करावे लागणारे अमानवी प्रयत्न, ढासळणारी मूल्यव्यवस्था त्यामुळे कुटुंबातील बाप व मुलगा यातील होणारे मूल्य संघर्ष, दोन पिढ्यातील होणारा संघर्ष व माणूस म्हणून जगताना जाणवणारी विषमता, शहराच्या तुलनेत खेड्यात येणारे भकासपण ,नापिकी, दुष्काळ तसेच वाढत्या महागाईमुळे उत्पादन खर्चामुळे न परवडणारी कृषी व्यवस्था या सर्व गोष्टीमुळे प्राथमिक भौतिक गरजांच्या पूर्तीसाठी लवकरात करणारी, प्रसंगी अन्यायाविरुद्ध बंड करुन उठणारी तरीही हतबल होणारी माणसं सदानंद देशमुखांच्या 'तहान' कादंबरीत दिसून येतात. 'तहान' कादंबरीतील तहान ही फक्त पाण्यासाठी आहे असे नसून ती अनेक कारणांनी ग्रामीण जीवनाला लागलेली तहान आहे असे म्हणावेसे वाटते.

'बारोमास' या कादंबरीतून बदलते कृषी जीवन तसेच ग्रामीण जीवनाच्या समाज चित्रणाबरोबरच विविध सामाजिक समस्यांचे चित्रण सदानंद देशमुख यांनी केले आहे. यात शेती करत असताना निर्माण होणाऱ्या समस्या या सर्वच मार्गाने दिसून येतात. सुभानराव सारख्या शेतकऱ्याच्या कुटुंबाची होणारी दुर्दशा ही भारतीय शेतकऱ्यांच्या दुःखाचे उदाहरण ठरते. शेतीच्या समस्या कधीच संपत नाहीत कारण शेतीवर वाढणारा खर्च, त्या खर्चाच्या मानाने येणाऱ्या उत्पन्नातील तूट, खाजगी सावकाराच्या व बँकांकडून घेतलेले कर्ज न फेडू शकल्यामुळे येणारी उद्विग्नता यासारख्या समस्येत आज भारतीय शेतकरी अडकला आहे. 'बारोमास' मधील सुभानराव, नरुभाऊ, रावसाहेब हे शेतकरी कृषी जीवनातील समस्येत अडकलेले तमाम शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करतात. त्यामुळेच शेतकरी आत्महत्या हा ज्वलंत प्रश्न उग्ररुप धारण करत आहे. ती एक सामाजिक समस्या बनली आहे. म्हणून सदानंद देशमुख या कादंबरीतून शेतकरी आत्महत्येमागील कटू सत्य सांगतात.

'बारोमास' या कादंबरीतून सुशिक्षीत बेरोजगारीचा प्रश्न मांडताना एकनाथ, मधु पवार, दिनकर दाभाडे यासारखे अनेक सुशिक्षीत तरुण नोकरीच्या शोधात फिरत आहेत. नोकरी न मिळाल्याने हे तरुण शेवटी गुन्हेगारीकडे वळतात. शिक्षण घेऊन पदरी निराशा पडणाऱ्या तरुणाची व्यथा येथे सांगितली आहे. जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, शिक्षणाचे बाजारीकरण यामुळे होरपळून निघणारी तरुण पिढी 'बारोमास' मध्ये दिसते. तसेच खाजगी सावकारीच्या पाशात अडकल्यामुळे रावसाहेब या सुभानरावाच्या जावयाला आत्महत्या करावी लागते. खाजगी सावकारी ही एक सामाजिक समस्या ठरते. या समस्येसोबतच ग्रामीण भागातील वृक्षतोडीचा प्रश्न देखील पर्यावरणाच्या दृष्टीने सामाजिक समस्या ठरत आहे. नापिकीमुळे शेतकऱ्यांकडे पैसा नसला की तो बांधावरील झाडे तोडून पैसा मिळवतो व आपली गरज भागवतो यावरुन आर्थिक समस्या ही महत्वाची आहे. ग्रामीण भागात शेती ही अर्थार्जनाचे साधन आहे. पण त्यासाठी येणारा उत्पादन खर्च जास्त येतो म्हणून शेती ही कशी बिनभरवश्याची आहे. हेच देशमुख 'बारोमास' मधून मांडतात.

'बारोमास' मधून शेतकरी आत्महत्या, खाजगी सावकारी, सुशिक्षीत बेरोजगारी, भ्रष्टाचार, डोनेशन, वृक्षतोड यासारख्या वाचांतून सामाजिक समस्या मांडलेल्या आहेत. शेतकऱ्यांच्या जीवनाची शोकांतिका मांडली आहे.

ग्रामीण कादंबरी वाङ्मयातून कृषी संस्कृतीचे दर्शन घडते. साहित्य हे पुढील काळातील अभ्यासकांना मार्गदर्शक ठरते. म्हणून 'गोतावळा', 'तहान', बारोमास' यासारख्या कादंबऱ्या वर्तमानातील कृषी व ग्रामीण जीवनाचे चित्र वाचकासमोर उभे करतात. त्यातून अनेक अभ्यासक, राजकारणी, समाजकारणींचे लक्ष वेधून घेतात. त्यामुळे ग्रामीण समाजाचे भेडसावणारे प्रश्न समाजासमोर मांडता येतात. ते प्रश्न शासनव्यवस्थेला या निमित्ताने साहित्याच्या माध्यमातून मार्गदर्शन ठरु शकतात असे म्हणावेसे वाटते. म्हणून साहित्याची कृषी व ग्रामीण विकासातील भूमिका महत्वपूर्ण ठरते.

संदर्भ:-

१. ग्रामीणता साहित्य आणि वास्तव - डॉ. आनंद यादव
२. ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन - डॉ. श्रीराम गुंदेकर
३. 'गोतावळा' - डॉ. आनंद यादव
४. 'तहान' - सदानंद देशमुख
५. 'बारोमास' - सदानंद देशमुख



Scanned with CamScanner